mcchandurbazar@gmail.com
cochandurbazar@gmail.com
दूरध्वनी क्र. 07227-243211, 244388

जा.क्र.:- न.प.चां.बा/बांध.विभाग/कावि- 1953 /२०२६
कार्यालय, नगर परिषद चांदूर बाजार जि.अमरावती
दिनांक :- 11 / 05 / २०२६

# ई-निविदा सुचना

मुख्याधिकारी, नगर परिषद चांदूर बाजार यांचे वतीने योग्य त्या वर्गातील सार्वजनिक बांधकाम विभागाकडे नोंदणीकृत असलेल्या कंत्राटदाराकडून खालील कामाकरीता बी-१ ई निविदा कार्यप्रणालीव्दारे (ऑनलाईन) निविदा आमंत्रित करण्यात येत आहे.

| अ.क्र | कामाचे नांव | कामाची अंदाजीत किंमत | अनामत रक्कम | ई निविदा प्रपत्राची रक्कम | काम पुर्ण करण्याचा कालावधी |
|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ |
| १ | चांदूर बाजार नगर परिषद हद्दीतील किरकोळ स्वरूपाची बांधकामे जसे रपटे बांधकाम करणे, लहान नाली बांधकाम करणे, इमारत व रस्त्याची दूरूस्ती करणे, कलरींग करणे इत्यादी किरकोळ कामे करणे. | १५,००,०००/- | १५०००/- | १५००/- | बारा महिने |
| २ | नगर परिषद अंतर्गत विविध कामाकरीता जे.सी.बी., पोकलॅन, ट्रॅक्टर ट्रॉली भाड्याने पुरविणे | १०,००,०००/- | १००००/- | १०००/- | बारा महिने |

**http://www.mahatenders.gov.in या संकेतस्थळावर निविदा सादर करण्याबाबतचा दिनांक व वेळ**

| अ.क्र | विवरण | दिनांक | वेळ |
|---|---|---|---|
| १ | निविदा डाऊनलोड करणे | दि. 13 / 05 / २०२६ पासून | दूपारी ४.०० वा. |
| २ | निविदा अपलोड करणे | दि. 13 / 05 / २०२६ ते दि. 21 / 05 /२०२६ | दूपारी ४.०० वा.पर्यंत |
| ३ | निविदा उघडणे (शक्य झाल्यास) | दि. 22 / 05 / २०२६ | दूपारी ४.०० वा. |

वरील कामाची निविदा प्रक्रिया संगणकावर ई निविदा प्रक्रियेव्दारे ऑनलाईन करण्यात येईल. या निविदेसंबंधी यापुढील सर्व सुचना / शुध्दीपत्रके ईंटरनेटच्या उपयोगाने ऑनलाईन करण्यात येईल.

वरील कामांची संपूर्ण माहिती http://www.mahatenders.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध असुन दि. 13 / 05 / २०२६ रोजी दूपारी ४.०० वाजेपासून दि. 21 / 05 /२०२६ ला दूपारी ४.०० वाजेपर्यंत डाऊनलोड करून भरता येईल.

ऑनलाईन निविदा सादर करतांना मागील तीन वर्षाचे आयकर रिर्टन, रजिस्ट्रेशन प्रमाणपत्र, नियमानुसार प्रतिज्ञालेख, अनुभवाचे, समकक्ष काम केल्याचे प्रमाणपत्र, जिएसटी व इतर अनुषंगीक कागदपत्रे तसेच खालील अटी व शर्तीमध्ये नमुद कागदपत्रे निविदेसोबत अपलोड करणे बंधनकारक राहील. अन्यथा निविदाधारकाची निविदा अपात्र ठरविण्यात येईल.

ऑनलाईन पध्दतीने सादर केलेली निविदा शक्य झाल्यास दि. 22 / 05 /२०२६ रोजी दूपारी ४.०० वाजता http://www.mahatenders.gov.in या संकेतस्थळावर नगर परिषद कार्यालय चांदूर बाजार येथे उघडण्यात येईल.

**अटी व शर्ती :-**

१) सर्व पंजीबध्द ठेकेदारांनी निविदा प्रपत्र डाऊनलोड करण्यासाठी व निविदा प्रक्रियेत भाग घेण्यासाठी ई-निविदा कार्यप्रणालीच्या http://www.mahatenders.gov.in या संकेतस्थळावर नोंदणी करणे आवश्यक आहे.



Scanned with CamScanner

mcchandurbazar@gmail.com
cochandurbazar@gmail.com
दूरध्वनी क्र. 07227-243211, 244388



२) निविदाधारकांनी वर नमुद केलेल्या संकेतस्थळावर ऑनलाईन संदर्भात काही शंका अडचणी असल्यास पुढील दूरध्वनी क्रमांकावर संपर्क साधावा. ०७२२७-२४३२११, १८००२३३७३१५

३) निविदाधारकांनी निविदा संदर्भात सर्व दस्तावेज ऑनलाईन सादर करणे अनिवार्य राहील.

४) निधीचे उपलब्धतेनुसार देयकाचे प्रदान करण्यात येईल.

५) जागेचे उपलब्धतेप्रमाणे कामे करून घेण्यात येईल.

६) इतर अटी व शर्ती ई निविदा नमुन्यामध्ये पहावयास मिळतील.

७) कोरे निविदा प्रपत्र व अनामत रकमेचे प्रदान ई पेमेंटव्दारे करावे लागेल.

८) सदर कामाचे देयक प्रदान करतांना नियमाप्रमाणे GST व इतर रकमेचे शोधन उपलब्धतेनुसार करण्यात येईल तसेच नियमाप्रमाणे रक्कम देयकातून कपात करण्यात येईल.

९) वरील प्रस्तावित कामे आवश्यकतेनुसार कमी किंवा जास्त करण्यात येईल तसेच वरील सर्व कामे ही मंजूर अंदाजपत्रकानुसारच करणे बंधनकारक राहील.

१०) प्रत्यक्ष बिलातून रॉयल्टीची देय असलेली रक्कम कपात करून शासनाकडे भरणा करण्यात येईल.

११) शासन निर्णयानुसार कामाची त्रयस्थ पक्षाकडून तांत्रिक तपासणी करून घेतल्यानंतरच अंतिम देयकाचे प्रदान करण्यात येईल.

१२) कामगाराचा शासकीय विमा यंत्रणेकडून विमा उतरविल्याची पावती कार्यालयात सादर करणे बंधनकारक राहील अन्यथा देयकातून कामगार विम्याची १ टक्के रक्कम कपात करण्यात येईल.

१३) निविदाकारास महाराष्ट्र शासन, सार्वजनिक बांधकाम विभाग, शासन निर्णय क्र.सीएटी/२०१७/ प्र.क्र.०८/इमा-२ दि.२७/०९/२०१८ मधील तरतूदी बंधनकारक राहतील.

१४) महाराष्ट्र नगर परिषदा, नगर पंचायती व औद्योगीक नगरी अधिनियम १९६५ चे कलम १६ (१) (आय) व कलम ४४ (१) (ब) चे प्रतिज्ञालेख रू.५००/- चे स्टॅम्पपेपरवर सादर करणे बंधनकारक राहील. (निविदा प्रसिध्द केल्याच्या कालावधीतील)

१५) स्थापत्य शैलीचे समकक्ष काम केल्याचे प्रमाणपत्र निविदेसोबत सादर करणे बंधनकारक राहील.

१६) सदरचे काम हे वार्षिक दरकरार पध्दतीने किरकोळ स्वरूपाचे असल्यामुळे सदरची कामे ही अत्यावश्यक असल्याने तातडीने करावी लागतात. न.प.निधी उपलब्ध राहत नसल्यामुळे काम झाल्या नंतर लगेच देयक अदा करणे शक्य न झाल्यास व तद्नंतर न.प.ने पुन्हा कामे सुचविल्यास सदरचे काम लगेच विहीत मुदतीत करून देणे बंधनकारक राहील. मागील देयक न मिळाल्यामुळे कामामध्ये कंत्राटदार टाळाटाळ करणार नाही अश्याप्रकारचे हमीपत्र रू.१००/- चे मुद्रांकावर लिहून देणे बंधनकारक राहील. अन्यथा निविदा रद्द करण्यात येईल.

१७) मागील किमान तीन वर्षाचे आयकर रिर्टन निविदेसोबत सादर करणे बंधनकारक राहील.

१८) कामाकरीता लागणारे तांत्रिक मनुष्यबळ व हत्यारे, औजारे, यंत्रसामग्री असल्याबाबतचे प्रमाणपत्र सादर करणे बंधनकारक राहील.

१९) ज्या निविदाकाराची निविदा अंदाजपत्रकीय दरापेक्षा कमी किंमतीची असेल त्यास शासन निर्णयानुसार प्रतिभूती सुरक्षा रकमेचा भरणा करणे बंधनकारक राहील. (डी.डी. / बँक गॅरंटी)

२०) मजूरांचा ई.पी.एफ. भरण्याची जबाबदारी संबंधीत कंत्राटदाराची राहील, निविदेसोबत ई.पी.एफ.नोंदणी प्रमाणपत्र व मागील महिण्याचे ई.पी.एफ. रकमेचा भरणा केल्याबाबतचे पावतीची (Premium Paid Reciept) प्रत सादर करणे बंधनकारक राहील.

२१) भारतात / राज्यात कोणत्याही शासकीय / निमशासकीय विभागाकडून काळ्या यादीत टाकले नसलेबाबतचे स्वयंघोषणापत्र रू.५००/- चे स्टॅम्पपेपरवर सादर करणे बंधनकारक राहील. (निविदा प्रसिध्द केल्याच्या कालावधीतील)



Scanned with CamScanner

mcchandurbazar@gmail.com
cochandurbazar@gmail.com
दूरध्वनी क्र. 07227-243211, 244388

जा.क्र.:- न.प.चां.बा/बांध.विभाग/कावि- 1953 /२०२६
कार्यालय, नगर परिषद चांदूर बाजार जि.अमरावती
दिनांक :- 11 / 05 / २०२६

२२) सदर ई निविदा कोणतेही कारण न देता रद्द करण्याचे अधिकार, मुख्याधिकारी, नगर परिषद चांदूर बाजार यांनी राखून ठेवलेले आहेत.

२३) जे निविदाकार ऑनलाईन स्वरूपात आपली निविदा सादर करतील अश्या निविदाकारांचे निविदेची इसारा रक्कम ऑनलाईन RTGS / NEFT / DD / FDR व्दारे संबंधीत कंत्राटदाराच्या बँक खात्यातूनच भरणे बंधनकारक राहील. त्याबाबतचा पुरावा सादर करणे बंधनकारक राहील.

२४) सदर ई-निविदा बद्दल तसेच निविदा सुचनेतील अटी व शर्तीबद्दल कोणताही वाद अथवा संभ्रम निर्माण झाल्यास मुख्याधिकारी, नगर परिषद चांदूर बाजार यांचा निर्णय अंतीम राहील.

**(सौ. मनिषा मनिष नांगलीया)**
अध्यक्ष,
नगर परिषद चांदूर बाजार

**(गीता ठाकरे)**
मुख्याधिकारी,
नगर परिषद चांदूर बाजार

Signature Not Verified
Digitally signed by Yash Govind Agrawal
Date: 2026.05.13 11:39:19 IST
Location: Maharashtra-MH



Scanned with CamScanner